Vol III Issue IX June 2014

ISSN No : 2249-894X

## Monthly Multidisciplinary Research Journal

# *Review Of Research Journal*

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**


Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## *Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........



**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.net**

Review Of Research
Vol. 3 | Issue. 9 | June. 2014
Impact Factor : 2.1002 (UIF)
ISSN:-2249-894X
Available online at www.ror.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# पुष्पा कांबळे यांची स्त्री जाणिवेची कविता

सविता माधवराव पवार

कला व विज्ञान महिला महाविद्यालय , मेहकर. जि. बुलडाणा.

**सारांश :-**

बुलडाणा जिल्हयाला एक फार मोठी साहित्य परंपरा लाभली आहे. मराठीतील आद्य ग्रंथकार श्रीपतीभट्टापासून, संत चोखामेळा, अमृतराय, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, ताराबाई शिंदे, ना. घ. देशपांडे, सदानंद देशमुख आदी अनेक नावे सांगता येतील; ज्यांनी मराठी साहित्याचा प्रांत समृध्द केला आहे. अलीकडे नव्या दमाचे काही लेखक दर्जेदार लेखन करीत आहेत. त्यामध्ये पुष्पा कांबळे हया एक प्रतिभासंपन्न कवयित्री आहेत. त्या गेल्या काही वर्षापासून कविता लेखन करून आपल्या विचारांना वाट मोकळी करून देत आहेत. 'जपलेल्या जखमा', 'अंतरीचे उसासे', आणि 'स्त्रीच्या नाळेत त्याची शेपटी अडकल्याने' हे त्यांचे कवितासंग्रह प्रसिध्द आहेत. 'जपलेल्या जखमा' हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह 2003 मध्ये प्रसिध्द झाला. 'अंतरीचे उसासे' या त्यांच्या काव्यसंग्रहाला महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अनुदान प्राप्त झाले आहे. 'स्त्रीच्या नाळेत त्याची शेपटी अडकल्याने' हा त्यांचा काव्यसंग्रह अलीकडे 2010 मध्ये प्रकाशित झाला आहे.

## प्रस्तावना :

स्त्री वेदनेचा मूल्यगर्भ आविष्कार त्यांच्या काव्यातून पाहायला मिळतो. प्रगल्भ, प्रतिभावान आणि चिंतनशील मनाची ही काव्यरूप अभिव्यक्ती आहे. पुष्पा कांबळे यांनी स्त्री केंद्रस्थानी ठेवून जे काव्य लिहिले, त्याला स्वानुभवाचा स्पर्श आहे. दाहक संघर्षातून आणि स्त्री वेदनेच्या प्रचंड कोंडमाऱ्यातून हे काव्य निर्माण झाले आहे. प्रस्तुत कवयित्रीचे शिक्षण हे जेमतेम इयत्ता आठवीपर्यंत झालेले, परंतु स्त्री जाणिवांची, स्त्री प्रश्नांची एक व्यापक अनुभूती, समंजस जाण त्यांच्याजवळ आहे. अज्ञान, अंधश्रध्दा, रुढी, परंपरा यांना त्यांच्या काव्यात स्थान नाही. जीवनाकडे पाहण्याचा विज्ञाननिष्ठ, डोळस दृष्टिकोन त्यांच्याजवळ आहे, जो आपल्याला त्यांच्या काव्यात प्रतिबिंबित झालेला दिसतो.

पुष्पा कांबळे यांनी त्यांच्या आयुष्यात अनेक दाहक अनुभव घेतले आहेत. व्यसनाधिन नवऱ्यामुळे झालेली संसाराची परवड, त्यातून करावा लागलेला जीवघेणा संघर्ष, हा प्रवास त्यांच्यासाठी अतिशय कष्टप्रद राहिलेला आहे. कडवट वेदनांचा दाहक अनुभव त्यांनीघेतलाआहे. या संघर्षातून, जीवनानुभवातून पुढे त्यांना कविता सापडली आणि तिचं त्यांचा श्वास बनली, जगण्याची प्रेरणा ठरली. त्यांनी आपल्या कवितांतून व्यक्त केलेले स्त्रियांचे दुःख, स्त्री वेदना त्यांच्यापुरतीच मर्यादित राहिलेली नाही. अखिल स्त्रीवर्गाचेच दुःख त्यांनी प्रातिनिधिक स्वरुपात व्यक्त केले आहे. प्रस्तुतशोधनिबंधामध्ये पुष्पा कांबळे यांची परिवर्तनवादी विचारांची कविता, त्यांच्या काव्यातून अभिव्यक्त होणारे स्त्रियांचे प्रश्न, त्यांच्या वेदना आणि कवयित्रीचा स्त्रीवादी दृष्टिकोन यांचा अभ्यास केला जाणार आहे. आजच्या काळाला नवे भान देणारी पुष्पा कांबळे यांची कविता आहे. त्यांच्या काव्याचा अभ्यास निश्चितच मोलाचा आणि दिशादर्शक ठरणारा आहे.

## स्त्री जाणिवांनाप्रखरपणे आविष्कृत करणारी कविता :

चिंतनशील वृत्तीच्या पुष्पा कांबळे यांनी जे पाहिले, अनुभवले त्यालाच काव्यरूपाने व्यक्त केले आहे. वास्तवाचा दाहक स्पर्श त्यांच्या कवितेला झाला आहे. स्त्रियांचे प्रश्न अनेक पातळ्यांवरून त्यांनी तपासून पाहिले आहेत. त्यावर चिंतन केले आहे. चिंताही व्यक्त केली आहे. या प्रश्नांमागील कारणांचा शोध घेत असताना उपायांची दिशाही दाखविली

आहे. स्वातंत्र्य प्राप्त होऊन एवढी वर्षे झाली, तरी स्त्रीच्या परिस्थितीत बदल होत नाही, एकंदर समाजव्यवस्थेतच परिवर्तनाच्या दृष्टीने दिसून येणारी उदासिनता, त्याविषयीची खंत आणि रोषही पुष्पा कांबळे आपल्या कवितांव्दारे व्यक्त करतात. आद्य स्त्रीमुक्तीवादी लेखिका ताराबाई शिंदे यांच्या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव आहे. त्यांची कविता स्त्रीवादी विचारांची प्रखर जाणीव व्यक्त करते. कधी ती टोकाची भूमिका घेतानाही दिसते. त्यांच्या काव्यातून अभिव्यक्त झालेला आशय त्यांच्या अंतर्यामीच्या अनुभवातून, त्या जाणिवांतून आलेला आहे. एक स्त्री म्हणून त्यांनी घेतलेले अनुभव, त्यातील वेदनांची दाहकता त्यांच्या लवकरच प्रकाशित होणाऱ्या आत्माकथनातून वाचकांसमोर येणार आहे.

पुष्पा कांबळे यांची कविता सत्याचा पाठपुरावा करणारी आहे. चिंतनाच्या पातळीवरून कवयित्री काही प्रश्न उपस्थित करते. स्त्रियांना एक वागणूक आणि पुरुषांसाठी वेगळी वागणूक ताराबाई शिंदे यांना रूचली नाही. त्यांनी स्त्रीपुरुषांची तुलना करून, स्त्रियांना मिळणाऱ्या दुय्यम वागणूकीविषयी जाब विचारला. पुष्पा कांबळे यांनाही ही दुटप्पी नीती मान्य नाही. स्त्री ही शरीर धर्माने विटाळल्या जाते, तिचे पतन आणि ऱ्हास तिच्या अब्रूने होतो. मग पुरुष परागमनात विटाळत नाही का? अशावेळी त्याच्या पतन व हत्येसाठी कुठले शस्त्र वापरायचे? असा प्रश्न त्या 'शस्त्र' या कवितेमध्ये उपस्थित करतात. स्त्रीला कधी अबला ठरवून, कधी रखेल ठरवून, व्यभिचारी ठरवून शिक्षा दिली जाते. यामुळे कवयित्री व्यथित होते. अशा स्वरूपाचा व्यवहार कुठल्या न्यायालयाच्या न्यायात बसतो, असा प्रश्न तिला पडतो. स्त्रियांचे प्रश्न सोडविण्याऐवजी त्याचे खच्चीकरण केल्या जाते. त्यामुळे हुंड्याचा प्रश्न मिटत नाही. त्यातून हत्या – आत्महत्या घडतात. स्त्रीला दुर्बल घटक ठरविल्यामुळे, तिच्या गौण स्थानामुळे स्त्रीभ्रूणहत्या घडतात. रखेल, परित्यक्ता, घटस्फोटीता, विधवा यांचे शोषण होते. त्यांच्यावर अन्याय, अत्याचार होतात. त्यात आणखी एकपतीव्रता सावित्री, सीतायांच्याविषयीच्याश्रध्दा समाजात रूजलेल्या आहेत. त्यातूनही स्त्रियांना त्यांच्या न्यायापासून, हक्कापासून डावलले जाते. आजही समाजात बालविवाह होतात, मुलीचे लग्न बीजवराशी लावून दिले जाते. पन्नाशी ओलांडल्यांची तृष्णा एका शोडशीने भागवावी, यासारखे व्यभिचारी अपराध समजात घडतात, स्त्रीवर ते लादले जातात. आजच्या भांडवलशाही व्यवस्थेने स्त्रीला समाजाची रखेल बनविले आहे. असा हा नीती गमावलेला समाज भुंकणाऱ्या, पिसाळलेल्या कुत्र्यासमान कवयित्रीला वाटतो. पण स्त्रीच्या नाळेत त्याची शेपटी अडकल्याने, स्त्री ही कमकुवत, अबला ठरत आहे याची चीड व खंत कवयित्रीला आहे..

स्त्री म्हणून जन्माला आल्यानंतर तिला अन्यायच सहन करावा लागतो, शोषणाचे बळी ठरावे लागते. मग स्त्री म्हणून जन्म घ्यायचा तो गुलामी पत्करण्यासाठीच का? असा प्रश्न पुष्पा कांबळेंना पडतो.

स्त्री तुझा जन्म,
कशासाठी होतो गं
सुख द्यायला आणि
दुःख विकत घ्यायला
तुझं उदरभरण होतंय
एका गुलाम जीवनाकरिता

'भोवऱ्यात' या कवितेत असा विचार मांडताना कवयित्री अस्वस्थ होते. जन्माचे प्रयोजन शोधते. सद्यपरिस्थिती काय आहे, ते मांडून, काय असायला हवे ते सूचित करते. कवितेच्या माध्यमातून प्रश्न उपस्थित करून, उत्तरांचा वेध आणि शोध पुष्पा कांबळे घेताना दिसतात. त्या म्हणतात, ''स्त्रीच्या ह्या आदिम जखमा या वैज्ञानिक युगातसुध्दा अधिक चिघळत आहेत. मी अस्वस्थ होत आहे म्हणून शोध घेत आहे, या जखमांसाठी नव्या उपचारांचा ........... कवितेच्या माध्यमातून हा शोध घेणे सदैव सुरू राहणारे आहे.''[1] उपचाराचा शोध घेतानाच कवयित्री कारणांचाही वेगवेगळ्या पध्दतीने मागोवा घेते. पुरुष हा स्त्रीच्या घटक चाचणीची अणुऊर्जा असूनही त्याचे पतन होत नाही पण स्त्री मात्र 'पतीता' ठरते. याविषयी चिंतन करताना, स्त्री ही सासर आणि माहेर दोन ठिकाणी वाटल्या गेली आहे. त्यामुळेही कदाचित तिची ही अवस्था झाली असावी, अशीही एक शक्यता त्यांना वाटते. स्त्रीने काळाबरोबर आधुनिक व्हायला पाहिजे. रूढी, परंपरा, यांच्या शृंखलेतून बाहेर पडायला पाहिजे. पण आजच्या आधुनिक डिजीटल युगात वावरणारी स्त्री वटसावित्रीचे व्रत करते, वडाला फेऱ्या मारते. अंधश्रध्देतच वावरणारी तिची बुध्दी आहे, त्यामुळे तिला विज्ञान पचत नाही आणि त्यामुळेही तिच्या स्थितीमध्ये सुधारणा घडत नाही, या वस्तुस्थितीकडे त्या निर्देश करतात.

समाजस्वास्थ्य टिकण्याच्या दृष्टीने पुरुषाने वा समाजाने स्त्रीला समान वागणूक दिली पाहिजे. स्त्रियांचे प्रश्न समाजाने सोडविल्यास सामाजिक प्रदूषण टाळता येईल. नीतीमत्तेच्या नावावर वादळे उठणार नाहीत. स्त्रियांना समान अधिकाराची तसेच लैंगिक अधिकाराचीही आवश्यकता आहे. 'समाजाचे प्रदूषण' या कवितेमध्ये कवयित्रीने मांडलेले विचार मौलिक आहते. समाज संस्कृती, परंपरा यांच्या नावाखाली अधर्म, अनीतीमत्तेची बांडगूळं पोसतो. त्यातून स्त्रीवर्गावर अन्याय होतो. त्यांना विषम वागणूक मिळते. दुप्पट वयाच्या विधुराला कुमारिका दिली जाते; मग विधवा, घटस्फोटीता, परित्यक्तेला कुमार का नको? असा प्रश्न पुष्पा कांबळे उपस्थित करतात. स्त्रियांच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी सामाजिक चालीरीतीविरुध्द बंडाच्या पवित्र्यात ही कविता उभी राहते. पुरुषाचे पुरुषत्व कशात शोधू? असा प्रश्न 'कौमार्य' या कवितेमध्ये कवयित्रीला पडतो. त्यांना कुठे पुरुषच सापडत नाही, असा विचार मांडताना त्यांची भाषा उपरोधाची, उद / वेगाची होऊन जाते.

पुष्पा कांबळे यांच्या कवितेतून येणारे स्त्रीवादी विचार काही वेळेला टोक गाठताना दिसतात. स्त्री ही पुरुषासारखी वागली असती तर पुरुष हा पुरुष राहिला असता का? स्त्री ही जर हक्काची वस्तूच नसती कर पुरुषाच्या अहंकाराचे काय झाले असते? आणि स्त्री जर भोगवादी झाली तर पुरुषाच्या तृष्णेचे काय? 'स्त्री.........' या कवितेतून कवयित्रीने केलेले हे चिंतन विचार करायला लावणारे आहे. स्त्रीचे मूल्य लैंगिकतेषी जोडून तिला घडविल्या जाते, त्यामुळेही ती दुबळी ठरली आहे. त्यासाठी स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलायला पाहिजे, असे कवयित्रीला वाटते. नवरेशाहीच्या रूपात त्यांना एक हिटलर, मुसोलिनी दिसतो. वस्तुस्थितीचे दाहक चित्रण करताना मनूवादी संस्कृतीविषयीचा उद्‌वेग आणि निषेध त्यांच्या काव्यातून प्रकटतो. 'वळू' या कवितेमध्ये त्या अतिषय स्फोटक विचार मांडून जातात. फलनासाठी वळू वापरतात तसा पुरुष वापरावा का? हा त्यांचा विचार त्यांच्या मनातील पराकोटीची चीड व्यक्त करणारा आहे. स्त्रीला प्रतिष्ठा, स्वयंभूपणा प्राप्त करून देण्यासाठी काय करता येईल, याचा विचार करताना समाजाविषयीची, पुरुषजातीविषयीची कटुता पुष्पा कांबळे यांची कविता व्यक्त करते. 'अवमान' या कवितेमध्ये त्या म्हणतात,

पुरुषा, तुला मूल्य नाही
मुल्य असते तर
दररोज मी एक
पुरुष विकला असता
दुसरा विकत घेतला असता.

स्त्रीला लागणारे लांच्छन, हे लांच्छन नाही, तिच्या मूल्याचा केलेला तो अवमान आहे, असे त्यांना सांगायचे आहे. 'पुष्पाताई कांबळे ह्यांनी पूर्वसुरींचे ऋण मान्य करून पुरुषी अहंभावावर त्या ज्या प्रखरतेने प्रहार करतात, ज्या वैचारिक उंचीवरून पुरुषांचे पौरुषत्वच नाकरण्याचे धाडस करतात, ही बाब तमाम बुध्दिवाद्यांच्या कसोटीला विविधांगी विचार चक्रांची गती देणारी आहे'.[2]लेखक व समिक्षक नरेंद्र लांजेवार यांचे हे विधान पुष्पाताई कांबळे यांच्या काव्यसामर्थ्याला दुजोरा देणारे आहे.

'जपलेल्या जखमा' हा पुष्पा कांबळे यांचा पहिला काव्यसंग्रह आहे. त्यांच्या काव्यप्रतिभेची जाणीव, आषय व आविष्काराचे सामर्थ्य या काव्यसंग्रहातून प्रकट झाले आहे. 'अभिजित अंग' या कवितेत त्या लढण्याचे सामर्थ्य व्यक्त करतात., मानवतेचा वेध घेतात. 'सूर्याच ग्रहण' या कवितेत समाजव्यवस्था बदलण्याची आवश्यकता मांडतात. युगानुयुगाची ही समाजरचना त्यांना सत्तेचे बीजारोपण व हत्यासत्राचीच कारणे वाटतात. 'वेदना' ही कविता संघर्षवृत्ती आणि स्वतःवरचा ठाम विश्वास प्रकट करणारी आहे. 'नोंद' ही कविता विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन मांडणारी आहे. 'मानवतेचा लढा' ही कविता शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांपासून घेतलेली प्रेरणा आहे. 'विषारी विचार,' 'धर्माच खूळ,' 'रेषा,' 'परिवर्तनाची सकाळ' अशा अनेक कवितांचा उल्लेख करता येईल, ज्यातून पुष्पा कांबळे यांच्या काव्यसामर्थ्याची कल्पना येते. मुक्तछंदामध्ये साकार झालेली ही कविता भोगवादी मानवी प्रवृत्तीवर प्रहार करते. 'आदिम, पुरातन, ऐतिहासिक आणि आधुनिक युगात स्त्रीने जपून ठेवलेल्या संपूर्ण जखमांचे प्रकटीकरण करणारी ही कविता नवी स्त्री घडवण्याचे सामर्थ्य घेऊन आली आहे, एवढे मात्र निष्चित.'[3] प्रस्तुत कवयित्री प्राप्त परिस्थितीवरच भाश्य करीत नाही तर समाजव्यवस्थेच्या परिवर्तनाचा विचार देते. स्त्रीशक्तीची त्यांना कल्पना आहे. आकाशाला गवसणी घालणारे आणि पृथ्वीषी नाते सांगणारे मातृत्व तिला प्राप्त आहे. स्त्रीच्या सामर्थ्यावरच कुटुंब व्यवस्था, समाजव्यवस्था टिकून आहे याची जाणीव ही कविता समाजाला करून देते.

'अंतरीचे उसासे' या काव्यसंग्रहामध्ये स्त्री सामर्थ्याचा प्रत्यय अधिक प्रभावीपणे येतो. मानवतेच्या अधिकाराची परिभाषा जाणून घेण्याची आवश्यकता पुष्पा कांबळे व्यक्त करतात. स्त्री मुक्ती व मुक्त स्त्री यातील भेद समजून घ्यायला त्या सांगतात. स्त्रीपुरुषांमधील लिंगभेदाची खोल दरीच त्यांना नको आहे. या लिंगभेदामुळेच स्त्रीभ्रूणहत्या घडतात. त्यामुळे हा भेद, ही विषमता थांबावी अशी प्रामाणिक भावना आंतरिक तळमळीतून त्या व्यक्त करतात.

मी एक अशी
शक्तीशाली, बलशाली,
स्फोटक, खंबीर
ब्रम्हांडाला जाब विचारण्यासाठी
एकमेवाव्दितीय

स्त्रीजवळ एवढे प्रचंड सामर्थ्य असताना, वसुंधरेप्रमाणे कालातीत मातृत्व प्राप्त झाले असताना, ती अबला कशी असू शकेल, असा प्रश्न ही कविता समाजव्यवस्थेला करते. 'स्त्रीपणाच्या विविध विभ्रमांना घेऊन जागणारी पुष्पा कांबळे सारखी कवयित्री आपल्या आयुष्यातील अनेक पेच उलगडून दाखवते. जे नियतीनं पदरात टाकलं ते आयुष्य भोगताना झालेली घुसमट 'अंतरीचे उसासे' या कविता संग्रहातील प्रत्येक कवितेमधून जाणवते.'[4]'स्त्रीच्या नाळेत त्याची शेपटी

अडकल्याने' या संग्रहातील कविता या पुढची पायरी आहे. समाजव्यवस्थेशी टक्कर देण्याची खुमखुमी आणि ताकद तिच्यामध्ये आहे. आधुनिक, स्वयंनिर्भर, आत्मसन्मान जपणारी नवविचाराची स्त्री घडविण्याचे सामर्थ्य तिच्यामध्ये आहे. मनुवादी विचारांच्या, समाज–संस्कृतीचा वारसा जपणाऱ्या 'डोमकावळ्यां'ना इशारा देण्याचे बळ, नैतिक सामर्थ्य असलेली ही कविता स्त्रीवादी विचाराचे पुढचे टोक गाठणारी आहे. स्त्रीला सन्मान मिळवून देण्यासाठी काळाच्या पुढे जाण्याची तिची तयारी आहे. स्त्रीचे विशाल मातृत्व पुरुषाच्या कैदेतच बंदिस्त आहे. तिचे स्वातंत्र्य गुदमरत आहे, याची खंत कवयित्रीला आहे. वस्तुतः पुरुष हा परावलंबी आहे. तो स्त्रीवर निर्भर आहे. परंतु तोच स्त्रीचे शोषण करतो, तिचे विश्व नाकारतो. अशा पुरुशाला बादच करायला हवे, असा विचार मांडणारी प्रखर स्त्री जाणिवांची ही कविता आहे. ज्योती लांजेवार, प्रज्ञा लोखंडे, अश्विनी धोंगडे, रजनी परूळेकर, मीना गजभिये यांची स्त्रीवादी विचारधारा पुष्पा कांबळे पुढे नेताना दिसतात.

***प्रस्थापित समाजव्यवस्थेला नकार :***

जिथे आत्मसन्मानाचा प्रश्न आहे, संघर्षाची गोष्ट आहे. तिथे नकार अटळ आहे. स्त्रीवर अन्याय करणारे समाजाचे नीतीषास्त्र पुष्पा कांबळे यांना मान्य नाही. येथे आंतरजातीय विवाह केला तर जातीचे पोट येते आणि जातीचा नवरा हुंडाबळी घेतो, अशी ही 'बदफैली' समाजव्यवस्थाच कवयित्री नाकारते. अशा या समाजात अन्याय, अत्याचार सोसणाऱ्या या स्त्रीला इच्छाधारी स्त्री व्हावसे वाटते. सत्याचा पाठपुरावा करणारी ही विज्ञाननिष्ठ कविता आहे. तिला परिवर्तन हवे आहे. त्यासाठी संघर्ष करण्याची तिची तयारी आहे. गौतम बुध्द, चार्वाक, शाहू, फुले, आंबेडकर, मार्क्स यांच्या विचारांचा प्रभाव कवयित्रीवर आहे. रूढार्थाने हे दलित काव्य नाही. दलित जाणिवा मात्र या कवितेतून व्यक्त होतात परंतु तेवढीच या काव्याची मर्यादा नाही. एकदंर समाजव्यवस्थेच्या परिवर्तनाचा ध्यास घेतलेली, मानवतावादी विचारांची ही कविता आहे. समाजातील विषमता, अन्याय, अत्याचार, शोषण, भ्रष्टाचार एकंदर मुल्यहीन समाजव्यवस्थेविषयी बंडखोरीची भाषा ही कविता व्यक्त करते.

जातीयतेची बंधने झुगारून देणे किंबहुना, ती मुळापासूनच उपटून टाकण्याची भाषा बोलणारी ही कविता आहे. कारण जेथे माणसाचे हक्क आणि अधिकार डावलले जातात, शोषण, दारिद्र्य यांचा सतत सामना करावा लागतो, त्या व्यवस्थेला विषबाधा झालेली असते. तिची मुळे खोलवर रूजलेली असतात. या व्यवस्थेला भिवून माणसे आत्महत्या करतात. कळी खुडायला शिकारी टपून बसलेले असतात. सद्यस्थितीत ही परिस्थिती समाजामध्ये दिसते. शिवाय महागाईने कंबरडे मोडले आहे. गरिबांचे हाल होताहेत. भूकेलाच दळून प्यायला लावणारी ही व्यवस्था, उलटा जाब विचारायला लागते. अशा व्यवस्थेत स्वातंत्र्य, समता, बंधुता हे मुल्ये अर्थहीन ठरतात. मानवतेचा समान अधिकार धुळीला मिळतो. संस्कृती, रुढी, परंपरांच्या नावावर शोषण होते. ही नकार देणारी व्यवस्था बदलून टाकण्याची आवश्यकता पुष्पा कांबळे यांनी आपल्या अनेक कवितांमधून व्यक्त केली आहे. त्यांनी मांडलेला हा विचार शोषित वर्गाचा आहे. ज्या वर्गाचे, स्त्री वर्गाचे अनादी काळापासून या व्यवस्थेने शोषण केले आहे. अशा परिस्थितीत मानसांची मने पेटवण्याचे काम पुष्पा कांबळे यांची कविता करते.

सुर्य शोधावाच लागेल
उजेडाला वाट दाखवायला
दिशा ठरवाव्याच लागतील
अंधार नष्ट करण्यासाठी

'स्वीकारायलाच हव' या कवितेमध्ये प्रकाशाचा मार्ग अंधार नष्ट करेल, असा विश्वास कवयित्रीने व्यक्त केला आहे. स्त्रीजातीला नागवणाऱ्या धर्माचाही अधिक्षेप त्यांनी केला आहे. 'धर्माचं खूळ' या कवितेमध्ये धर्माचे खूळ स्त्रीच्या गर्भातूनच नष्ट करण्याचा क्रांतीकारी विचार त्यांनी मांडला आहे. जातीयता, धर्मांधता, शोषण, दारिद्र्य यांनी ग्रस्त झाालेल्या या समाजव्यवस्थेला सुरुंग लावण्याची भाषा ही कविता व्यक्त करते. न्यायालयातील कलमांचे कोलदांडे काढून फेका, त्यावेळी तरी समान हक्क मिळतील असा विचार मांडणारी ही कविता न्याय मागताना बंडखोर बनते. अज्ञान, अंधश्रध्दा, कर्मकांड नाकारणाऱ्या समाजव्यवस्थेची अपेक्षा या कवितेला आहे. 'मानवी भाषा' या कवितेमध्ये कवयित्री म्हणते,

उदरात एवढी मोठी
जागा असल्यावरही
हे देवलोक हो तुम्ही
कमळाच्या देठात
वराहाच्या पोटात
यज्ञाच्या अग्निकुंडात भूगर्भात
कषा कषात जन्म घेता.

संगणकाची भाषा बोलणाऱ्या आजच्या समाजात अशा खूळचट कल्पनांवर आजही आपल्याला जनमानसात असलेली श्रध्दा दिसते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर एवढा काळ जाऊनही समाजाचे प्रश्न सुटले नाहीत. दारिद्र्य, बेकारी, स्त्रियांचा व्यापार आजही आपल्याला पोखरत आहे. 'विषारी विचार' या कवितेमध्ये कवयित्री म्हणते.

प्रगत देशाच्या राष्ट्राध्यक्षा,
तुझ्या राज्यात काय काय पिकतं
काळ्या रंगाचा
अनवाणी पाऊस
काळी पिकं पांढरी बेकारी
संप, मोर्चे, बंद, गुंडागर्दी
भले की ते देशद्रोही नसतील
परंतु ते मानवद्रोही
नक्कीच आहेत.

संवेदनशील माणूस, मानवतावादी समाजघडण्याची आवश्यकता पुष्पा कांबळे यांनी व्यक्त केली आहे. त्यासाठी प्रस्थापित समाजव्यवस्था मोडीत काढावी लागेल. नवी स्त्री घडण्याची आवश्यकता, नवसमाजरचनेची आवश्यकता एकविसाव्या शतकामध्ये वावरताना कवयित्रीला महत्त्वाची वाटते. त्यासाठी त्यांनी आपल्या कवितेतून मांडलेली संघर्षाची भाषा ही अटळ आहे. वास्तवाला धरून आहे. समाजपरिवर्तनाची तळमळ व्यक्त करणारी आहे.

### समारोप :

एकविसाव्या शतकाची भाषा बोलणारी पुष्पा कांबळे यांची कविता अत्यंत संवेदनषील मनाने स्त्री प्रश्नांचा मागोवा घेते. अनेक तऱ्हांनी होणारे स्त्रियांचे शोषण समाजासमोर आणते. स्त्रीशक्तीची जाणीव करून देते. स्त्रीवादी विचारधारा मांडताना ताराबाई शिंदे यांच्याशी जवळकीचे नाते दाखवते. स्त्रियांचे दुःख, वेदनाच ती प्रकट करत नाही तर पुढचा विचार मांडते. उपाययोजना सुचवते. स्त्रियांच्या लैंगिक गरजांविषयी रोखठोकपणे बोलते. शोषण झाल्याची, अन्याय झाल्याची भाषा बोलताना सौम्यतेचे पोकळ ढोंग ती आणत नाही. तिच्या आविष्काराची ती शैली नाही. आशयसंपन्न अशी पुष्पा कांबळे यांची कविता साध्या, सरळ शैलीत अभिव्यक्त होते. आपले विचार आपल्या काव्यातून निःसंदिग्धतेने कवयित्रीने मांडले आहेत. काव्यातून आलेल्या सामाजिक आशयाला चिंतनशील विचारांची बैठक आहे. सत्याचा शोध घेणारी ही कविता कुठे वाकणारी, झुकणारी नाही. बंडखोर विचारधारा जोपासत असतानां, आतून मुळात ती संयमित आहे. शोषितांच्या दुःखाला अधोरेखित करण्याचे सामर्थ्य या काव्यात आहे. त्यांची कविता स्त्रीवर्गाच्या शोषणावरच बोलते असे नाही तर मानवी जीवनाचे व्यापक संदर्भ या कवितेमध्ये येतात.

परिवर्तन हा या काव्याचा गाभा आहे. परिवर्तन घडवताना विज्ञाननिष्ठ दृष्टीकोनाचा अंगिकार ही कविता करते. चार्वाक, फुले, आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव तिच्यावर आहे. समाव्यवस्थेचे विदारक चित्र ती रेखाटते. ते रेखाटताना ती विषण्ण होते, प्रश्न करते आणि उत्तरेही शोधण्याचा प्रयास करते. आपल्या परीने तिला काही उत्तरे सापडतात. न्यायव्यवस्था, समाजव्यवस्था, संस्कृती, समाज सारेच भ्रष्ट, चैतन्यहीन झालेले असताना जाग आणू पाहणारी ही कविता आहे. मुळाशी जाऊन मर्म जाणण्याचा प्रयत्नती करते. विषमता, अन्याय, अत्याचार याविरोधात लढणारी पुष्पा कांबळे यांची स्त्री जाणिवांची कविता पराभवाची पर्वा करीत नाही. ती खऱ्या अर्थाने लढवय्यी आहे. मुक्त स्त्री, विज्ञाननिष्ठ, आधुनिक स्त्री घडवण्यासाठी आणि आजच्या समाजव्यवस्थेतील तिचे स्थान अधोरेखित करण्यासाठी पर्यायाने त्यातून नवसमाज निर्मितीचे प्रयोजन असणारी पुष्पा कांबळे यांची कविता समकालीन मराठी काव्यात स्वतःचे मूल्य जपणारी आहे.

### संदर्भटिपा :

1.पुष्पा कांबळे, जपलेल्या जखमा, बुलडाणा, आवृत्ती पहिली, 2003, मनोबत, पृ.क्र 6
2.नरेंद्र लांजेवार, पुष्पा कांबळे 'स्त्रीच्या नाळेत त्याची शेपटी अडकल्याने', बुलडाणा, आवृत्ती पहिली, 2010, 'स्त्री वेदनेचा चिंतनशील आविष्कार', पृ.क्र 1
3. भगवान ठग, पुष्पा कांबळे, जपलेल्या जखमा, उनि, प्रस्तावना पृ.क्र 6
4. भगवान ठग, पुष्पा कांबळे, अंतरीचे उसासे, औरंगाबाद, आवृत्ती पहिली 2004 प्रस्तावना, पृ.क्र 6

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.net